## निशाणी क्रमांक ३८ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने त्याच्याविरूध्द झालेला पुरावा बंदचा चा आदेश रद्द होऊन मिळणेकरीता केलेला आहे.

२. वादीच्या मते, वादी ही वयोवृध्द असून ते वारंवार आजारी असतात, त्यामुळे वादीला संबंधीत सर्व कागदपत्रे गोळा करून या कामी पुरावा देणे शक् झाले नाही. त्यामुळे सदरचा दावा गुणावगुणावर चालणेसाठी वादीविरूध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द होवून वादीस पुरावा देण्याची संधी मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने त्याच्याविरूध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द होऊन वादीचा पुरावा प्रस्तुत कामी दाखल करुन घेणेची विनंती वादीने केलेली आहे.

४. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. परंतु प्रतिवादींनी आपले म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींच्या म्हणण्याविना चालविण्यात आला.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. सबब एकूणच परिस्थिती पाहता व प्रस्तुत दाव्याचा विषय पाहता, न्यायाचे कारणास्तव प्रस्तुत वादीस संधी देणे आवश्यक वाटते. प्रस्तुत वादीस न्यायाचे कारणास्तव संधी दिली नाही तर न्यायालयीन कामकाजाचे बाहुल्य वाढणार आहे व त्याच्या न्याय हक्कावर गदा येणार आहे. सबब, न्यायाचे तत्व विचारात घेता, दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी वादीस पुरावा देण्याची संधी देणे आवश्यक वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीविरूध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करण्यात येत आहे

ANIL SAHEBRAO SONWALKAR
Digitally signed by ANIL SAHEBRAO SONWALKAR
Date: 2024.08.28 16:57:14 +0530

( ए. एस. सोनवलकर )

दिनांकः– २७/०८/२०२४. ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पंढरपूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | M. P. Gheradi. |
| Court | - | 5th Jt. CJJD & JMFC, Pandharpur. |
| Date of Judgment/Order | - | 27/08/2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 27/08/2024 |
| Judgment/Order uploaded on | - | 28/08/2024 |